

महामार्ग रुंदीकरणामुळे केरी
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



भारताचा इंग्लंडवर सहज विजय
पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 155 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 7 February 2025 | Pages 4 | ₹ 4

# 'डबल इंजिन'ला सुप्रीम कोर्टाचा दणका!

## ओडीपी संबंधी राज्य सरकारची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

टीम दैनिक हेराल्ड :

**नवी दिल्ली, दि. ६ : बाह्यरेखा विकास योजना (ओडीपी) क्षेत्रातील बांधकामांना स्थगिती देणाऱ्या उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणारी गोवा सरकारची विशेष परवानगी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावत राज्य सरकारला अतिरेकी शहाणपणाबद्दल कानपिचक्या दिल्या.**



गोव्याला काँक्रीट जंगल करु नका
सर्वोच्च न्यायालय

गुरुवारी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांनी गोवा सरकारच्या वकिलाला उद्देशून टिप्पणी केली की, कृपया गोव्याला काँक्रीटच्या जंगलात रूपांतरित करू नका. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने २३ जानेवारी २०२५ रोजी गोवा उच्च न्यायालयाच्या निर्देशांविरुद्ध राज्याची याचिका फेटाळून लावली, ज्यामध्ये कळंगुट, कांदोळी , हडपडे , नागवा आणि पर्रा या ओडीपी क्षेत्रांमध्ये बांधकामांवर निर्बंध लादण्यात आले होते.

कळंगुट – कांदोळी (२०१८) आणि हडपडे –नागवा –पर्रा (२०२०) ओडीपीमधील कथित अनियमिततेविरुद्ध गोवा फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने दाखल केलेल्या जनहित याचिकेतून हा कायदेशीर वाद निर्माण झाला आहे. गेल्या एक वर्षापेक्षा जास्त काळ हा खटला न्यायालयीन छाननीखाली आहे, अनधिकृत रिझोनींग झालेले असूनही सरकार योजनांचे समर्थन करण्याचा प्रयत्न करीत आहे. उच्च न्यायालय २१ फेब्रुवारी २०२५ रोजी या जनहित याचिकेवर अंतिम सुनावणी घेण्यास तयार आहे.

राज्य सरकारने सुरुवातीला एप्रिल २०२२ मध्ये ओडीपी निलंबित केले होते आणि एक पुनरावलोकन समिती नियुक्त केली होती, ज्यामध्ये खाजगी गुंतवणूकदारांना फायदा पोहोचवणासाठी मोठ्या प्रमाणात या क्षेत्रांचे आरक्षण बदलण्यात आले असल्याचे उघडकीस आले होते. समितीचे निष्कर्ष स्वीकारूनही, सरकारने डिसेंबर २०२२ मध्ये ओडीपी पुन्हा अधिसूचित केले, अनेक वादग्रस्त बदल कायम ठेवले. याव्यतिरिक्त, सुधारित ओडीपीमध्ये नवीन सर्वेक्षण क्रमांक बदलण्यात आले आहेत.

कायदेशीर आव्हानांना प्रतिसाद म्हणून, सरकारने पाच गावे नियोजन क्षेत्रातून काढून टाकली, ज्यामुळे

पान २ ▶

# सरकारकडून पाच विधेयकांची तयारी

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ६ : गोवा सरकार येत्या अधिवेशनात पाच विधेयके सादर करणार आहे, ज्यात कोमुनिदाद संहितेत सुधारणा विधेयक समाविष्ट आहे, ज्यामुळे कोमुनिदादच्या जमिनीच्या वापरावर कडक निर्बंध लादले जातील आणि मूळ प्रस्तावित केलेल्या उद्देशांव्यतिरिक्त इतर कारणांसाठी त्याचा वापर करण्यास मनाई केली जाईल.गोवा विधानसभेच्या कार्यपद्धती आणि कामकाजाच्या नियमांच्या विधेयकांचा परिचय, विचार आणि मंजूरीशी संबंधित नियम १४१, १४३ आणि १५६ निलंबित केल्यानंतर सर्व विधेयके मंजूर केली जातील.

मंत्रिमंडळाने प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर ऑक्टोबर २०२४ मध्ये कोमुनिदाद संहितेवरील अध्यादेश आणण्यात आला आणि सरकार आता या विधानसभेच्या अधिवेशनात त्याचे कायद्यात रूपांतर करण्याचा प्रयत्न करीत आहे.

कोमुनिदादच्या प्रशासकाला जमिनीच्या वापरावर प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्याचा अधिकार देण्यात येईल, ज्यामुळे त्याच्या मूळ उद्देशापासून कोणताही विचलन रोखता येईल. एकदा असा आदेश जारी झाल्यानंतर, नगर नियोजन विभाग, नियोजन आणि विकास प्राधिकरण, नगर परिषद, ग्रामपंचायत किंवा पणजी शहर महानगरपालिका (सीसीपी) यासह इतर कोणत्याही प्राधिकरणाला संबंधित जमिनीसाठी परवानग्या, मंजुरी, मान्यता किंवा ना हरकत प्रमाणपत्रे (एनओसी) देण्याची परवानगी राहणार नाही.

याव्यतिरिक्त, सरकार आणखी तीन विधेयके सादर करणार आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये अशाच प्रकारचे दुरुस्ती विधेयक मागे घेतल्यानंतर, 'द गोवा क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट्स (नोंदणी आणि नियमन)' नावाचे हे दुरुस्ती विधेयक क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट्ससाठी तात्पुरत्या नोंदणींचे पुनरुज्जीवन आणि विस्तार करण्यावर लक्ष केंद्रित करते.

याव्यतिरिक्त, सरकार येत्या विधिमंडळ अधिवेशनात गोवा पाणीपुरवठा तरतूद (सुधारणा) विधेयक, गोवा व्हॅट (सुधारणा) विधेयक, २०२५; गोवा वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) (सुधारणा) विधेयक २०२५ आणि गोवा मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, २०२५ सादर करण्याचा आणि मंजूर करण्याचा विचार करत आहे.

सरकार गोवा मीडिया पर्सन अँड मीडिया इन्स्टिट्यूशन्स (हिंसाचार प्रतिबंधक आणि मालमत्तेचे नुकसान किंवा नुकसान) विधेयक, २०२२ मागे घेण्याची शक्यता आहे. पत्रकारांना हिंसाचारापासून संरक्षण देण्यासाठी हे विधेयक २०२२ मध्ये पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेत सादर करण्यात आले होते.



# राज्यपालांच्या भाषणाला विरोधकांचा सभात्याग

## फक्त दोन दिवसांचे अधिवेशन घेण्याच्या सरकारच्या निर्णयाचा केला निषेध

टीम दैनिक हेराल्ड

पर्वरी, दि. ६ : सोमवारी राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांचे भाषण सुरू असताना अनेक विरोधी आमदारांनी सभात्याग केला आणि विधानसभेचे अधिवेशन फक्त दोन दिवसांनी कमी करण्याच्या निर्णयाचा निषेध केला.सभात्याग करणाऱ्यांमध्ये विरोधी पक्षनेते युरी आलेमाव , रिव्होल्यूशनरी गोवन्स पार्टी (आरजीपी) आमदार वीरेश बोरकर आणि आम आदमी पक्षाचे (आप) आमदार वेंझी व्हिएगस आणि क्रूझ सिल्वा यांचा समावेश होता. राज्यपाल बोलण्यासाठी उभे राहताच निषेध सुरू झाला, विधानसभेच्या मर्यादित कालावधीवर आलेमाव यांनी टीका केली.

केरळ विधानसभा वर्षातून सरासरी ५० दिवस बैठक घेते, तर गोव्याची सरासरी फक्त २६ दिवस असते. हा लोकशाहीवर हल्ला आहे, असे सभापतींनी व्यत्यय आणण्यापूर्वी आलेमाव म्हणाले. त्यानंतर, ते आणि इतर आमदार निषेधार्थ सभागृहाबाहेर पडले.सभात्यागानंतरही,

पान २ ▶

### विरोधी पक्षाच्या वर्तनावर मुख्यमंत्र्यांची टीका

**राज्यपाल सभागृहाबाहेर पडताच मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी आलेमाव यांच्या अनुपस्थितीचा निषेध केला आणि त्यांना परंपरेचे उल्लंघन म्हटले. राज्य विधानसभेच्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडले आहे की विरोधी पक्षनेते राज्यपालांच्या भाषणाला सभागृहात नव्हते. सभागृहाचे पावित्र्य राखले पाहिजे, असे सावंत यांनी म्हटले.विधिमंडळ कामकाज मंत्री आलेक्स सिक्वेरा यांनी विरोधी पक्षाच्या आक्षेपांना दुर्लक्षित केले आणि मार्चमध्ये आणखी एक अधिवेशन नियोजित असल्याचे निदर्शनास आणून दिले. हे अधिवेशन व्यवसाय सल्लागार समितीने मंजूर केले होते, जिथे सर्व सदस्य उपस्थित होते. जर ते नाराज असतील तर त्यांनी सभात्याग करण्याऐवजी तेथे त्यांच्या चिंता व्यक्त करायला हव्या होत्या, असे ते म्हणाले. जलसंपदा मंत्री सुभाष शिरोडकर म्हणाले की, दोन दिवसांचे अधिवेशन मुख्यमंत्री आणि सभापतींशी सल्लामसलत करून घेतलेला निर्णय होता.आणखी एक अधिवेशन होईल आणि सरकार प्रशासनावर लक्ष केंद्रित करेल,असे ते म्हणाले.**

## निवडक

### कर्जापेक्षा अधिक रक्कमेची वसुली : मल्ल्या

बंगळुरू, दि. ६ : बँकांकडून घेतलेल्या कर्जापेक्षा अधिक रक्कम बँकांनी वसूल केली आहे, असे म्हणत फरार उद्योगपती विजय मल्ल्याने कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. बँकाचे माझ्यावर ६,२०० कोटी रूपयांचे कर्ज आहे. पण, बँकांनी याहून अधिक रक्कम वसूल केली, असा दावा विजय मल्ल्याने याचिकेद्वारे केला आहे. विजय मल्ल्याने कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावेळी बँकांकडून आणि अन्य कर्जदारांकडून वसूल केलेल्या रकमेचे तपशीलवार मागितले आहे. तसेच, बँकांनी जप्त केलेली संपत्तीची विक्री थांबवण्याची मागणी मल्ल्यानं याचिकेद्वारे केली आहे. यानंतर उच्च न्यायालयाने बँकांना नोटीस बजावल्या आहेत. न्यायाधीश आर. देवदास यांनी १३ फेब्रुवारीपर्यंत बँकांना उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. मल्ल्याच्यावतीने न्यायालयात युक्तिवाद करताना वकील साजन पूर्वैया यांनी सांगितले की, मल्ल्याकडून यापूर्वीच रक्कम वसूल करण्यात आली आहे. तरीही, अतिरिक्त रक्कम वसूल करण्यात येत आहे.

### हवामान

कमाल : २९ किमान : २१
आर्द्रता : ७२

### बाजार भाव

सोने : ₹ ८५,३१५ (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ९८,५०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७८,५८३ .२५↑ (३७८.२१)
निफ्टी : २३,७३९.२५ ↑ (१३९७.०७)

# 'कॅश फॉर जॉब' घोटाळा : ४३ अटक, १६ प्रकरणे इडीकडे, ३ आरोपपत्रे दाखल

## राज्यपालांनी सरकारच्या कामगिरीचे केले कौतुक : विरोधकांचा सभात्याग

टीम दैनिक हेराल्ड



पणजी, दि. ६ : २०२४ साली उघडकीस आलेल्या सरकारी नोकरी घोटाळ्यात ४३ आरोपींना अटक करण्यात आल्याचे गोव्याचे राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांनी गुरुवारी सांगितले. राज्य विधानसभेत बोलताना ते म्हणाले की , माझ्या सरकारने सरकारी नोकऱ्यांसाठी एजंट म्हणून काम करणाऱ्या फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध निर्णायक कारवाई केली आहे.आतापर्यंत प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे त्वरित एफआयआरमध्ये रूपांतर करण्यात आले आहे.

विधासभा अधिवेशनादरम्यान केलेल्या भाषणात राज्यपालांनी माहिती दिली की , पोलिसांनी आतापर्यंत ४३ आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणांमध्ये वाहने, सोन्याचे दागिने, बँक खाती आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. अशा ३ प्रकरणांमध्ये आधीच आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे आणि न्यायालयात खटले सुरू आहेत. सरकार सर्व प्रकरणांना तार्किकदृष्ट्या अंतिम टप्प्यात नेईल असे सांगून राज्यपाल म्हणाले, माझ्या सरकारने राज्यातील पोलिस अधिकाऱ्यांना अंमलबजावणी संचालनालय आणि वित्तीय गुप्तचर युनिटसारख्या इतर योग्य एजन्सींकडे अशा प्रकरणांची चौकशी करण्याची मोकळीक दिली आहे आणि त्यानुसार अशा १६ प्रकरणांमध्ये संबंधित एजन्सींकडे माहिती सामायिक करण्यात आली आहे.

सुरक्षित ड्रायव्हिंग वातावरण प्रदान करण्यासाठी सरकार प्रामाणिक प्रयत्न करत असल्याचे सांगून राज्यपाल म्हणाले की, मद्यधुंद वाहन चालवणे आणि अतिवेगाने वाहन चालवणे यावर अंकुश ठेवण्यासाठी विशेष मोहिमा सुरू करण्यात आल्या आहेत.चालू आर्थिक वर्षात नोव्हेंबर २०२४ पर्यंत मोटार वाहन कायद्यांतर्गत एकूण ४,९१,७९६ वाहतूक उल्लंघनाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत आणि २९.२८ कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे, असे ते म्हणाले.

ते म्हणाले की, केपे , फातोर्डा, ,मायना कुडतरी येथे नवीन पोलिस स्टेशन इमारती आणि तेरेखोल येथील विद्यमान कोस्टल सिक्युरिटी पोलिस स्टेशनला ॲनेक्स इमारतीचे बांधकाम ३६.२३ कोटी रुपयांच्या अंदाजे खर्चाने सुरू आहे.काणकोण पोलिस स्टेशनजवळ नवीन आयआरबीएन कॅम्प उभारण्यात येत आहे, असे ते म्हणाले.राज्यपालांनी असेही सांगितले की, पिंक फोर्सने संकटात सापडलेल्या महिला आणि इतर आपत्कालीन कॉल्सशी संबंधित ५,३८७ कॉल्सना प्रतिसाद दिला आहे आणि कायदा अंमलबजावणी आणि सायबर सुरक्षा मजबूत करण्यासाठी आयआयटी गोवा आणि बिट्स पिलानी, गोवा यांच्याशी सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यांनी सांगितले की, सरकारी नोकऱ्यांसाठी पारदर्शक आणि गुणवत्तेवर आधारित भरती सुनिश्चित करण्यासाठी आणि फसव्या व्यक्तींना सरकारी नोकरी एजंट म्हणून खोटे दावे करण्याची कोणतीही संधी दूर करण्यासाठी सरकारने गोवा कर्मचारी निवड आयोगाची स्थापना केली आहे.राज्यपालांनी असेही सांगितले की, राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) ची अंमलबजावणी २०२७–२८ पर्यंत सर्व ग्रेडमध्ये पूर्ण केली जाईल आणि पुढील दोन वर्षांचा वापर आवश्यकतेनुसार संस्थांच्या क्लस्टर निर्मिती आणि भौतिक पुनर्रचनासाठी केला जाईल जेणेकरून २०३० पर्यंत राज्यात एनईपी अंमलबजावणी पूर्ण होईल.२०२४–२५ मध्ये, एनईपी–२०२० ची अंमलबजावणी बालवाटिका–२ मध्ये फाउंडेशनल स्टेजमध्ये आणि इयत्ता नववीच्या ग्रेडमध्ये सुरू ठेवण्यात आली, असे त्यांनी सांगितले.

